जा.क्र./पोसहआ/वाह./नियोजन/6230 /२०१९
पोलीस आयुक्त, कार्यालय, पुणे शहर
दिनांक - 23/07/२०१९

# अधिसुचना

पुणे शहरातील वाहतुक परिस्थिती दिवसेंदिवस जिकीरीची होत आहे. रोजच्या रोज वाहनांच्या संख्येमध्ये भर पडत आहे. पुणे शहराचे मध्यवर्ती भागामध्ये मोठया प्रमाणात शासकीय कार्यालये ज्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, सेंट्रल बिल्डिंग, विधानभवन, विभागीय आयुक्त कार्यालय, ससुन हॉस्पिटल, रेल्वे स्टेशन, पोलीस आयुक्त कार्यालय, जिल्हा परिषद इत्यादी कार्यालये आहेत या ठिकाणी येणा-या नागरीकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. दुस-या बाजुला शिवाजीनगर न्यायालय,महानगरपालिका, शिवाजीनगर बस स्थानक, रेल्वे स्थानक इत्यादी मोठया आस्थापना आहेत. सदरचे दोन्ही भागांना जोडणारा शाहीर अमर शेख चौक असुन सदर चौकात दर रविवारी व बुधवारी रोडवर जुना बाजार भरतो. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. लोक रस्त्याचे दुतर्फा मोठया प्रमाणात अस्ताव्यस्त दुकाने लावतात व वाहने पार्क करीत असल्याने शाहीर अमर शेख चौक ते कुंभारवेस या ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतुकीचा खोळंबा होवु लागल्याने नागरीकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे सदर समस्येवर तोडगा काढुन नागरीकांना दिलासा देण्याचे दृष्टीने वाहतुकीचे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

त्या अनुषंगाने शाहीर अमर शेख चौक ते कुंभारवेस या मार्गाच्या दोन्ही बाजुस दुचाकी, चारचाकी वाहनांच्या पार्कीग व रविवारी, बुधवारी भरणारा बाजार यामुळे वाहनचालक, जेष्ठ नागरीक व व्यावसायिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नागरीकांकडुन सतत तक्रारी प्राप्त होत आहेत. वाहतुक विभागामार्फत मोहिम राबविण्यात येत आहे, परंतू सदरची उपाय योजना तोकडी/अपुरी पडत आहे. रस्त्याची लांबी, रुंदी लक्षात घेता वाहतुक सुरळित व सुव्यवस्थित होवुन नागरीकांना त्रास होणार नाही ही बाब लक्षात घेता वाहतुकीच्या दृष्टीकोनातुन सुधारित अधिसुचना काढणे गरजेचे आहे.

वरील बाबींचा विचार करता मी डॉ. रविंद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ (मुंबई अधिनियम क्र. २२) चे कलम ३३ पोट कलम (१),(ब), (२), (६) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये माझ्या प्रभावाखाली असलेल्या पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पुणे शहरातील वाहतुकीचे नियमनाकरीता खालील नमुद आदेश पारित करीत आहे.

यापुर्वी शाहीर अमर शेख चौक ते कुंभारवेस पर्यंत वाहतुक नियमनाकरीता प्रसारीत करण्यात आलेल्या अधिसुचनेमुळे नागरीकांना नाहक त्रास होत असल्याने सुधारीत अधिसुचना काढण्याकरीता पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांनी अहवाल सादर केल्याने यापुर्वी निर्गमीत करण्यात आलेली अधिसुचना रद्द करण्यात येत असुन शाहीर अमर शेख चौक ते कुंभारवेस मार्गावरील वाहतुक सुरळीत राहण्याकरीता प्रायोगीक तत्वावर पुढील ३० दिवसांकरीता अंशतः बदल करणे आवश्यक असल्याचे दिसुन येत आहे. “शाहीर अमर शेख चौक ते कुंभारवेस या रस्त्यावरील वाहतुकीचे नियमनाकरीता नमुद निर्दीष्ट ठिकाणी प्रायोगीक तत्वावर नो-पार्कीग झोन तसेच रविवारी व बुधवारी भरणा-या जुना बाजारातील दुकाने रस्त्यावर लावण्यास निर्बंध करण्यात येत आहे”असे आदेश पारीत करीत आहे.

सदर अधिसुचना दिनांक२४/७ /२०१९ ते पुढील आदेशापर्यंत अंमलात राहील.

कर्तव्यावर असलेले शासकीय वाहने, पोलीस विभागाची वाहने, अग्निशामक दलाची वाहने व ॲम्ब्युलन्स तसेच त्या भागातील अधिकृत रिक्षा थांबे यांचेकरीता ही अधिसुचना लागु होणार नाही. तसेच संरक्षित व अतिमहत्वाच्या व्यक्ती यांचे ताफ्यातील वाहने रोडचे दोन्ही बाजुने पार्क होतील.

सदर अधिसुचना आज दिनांक २३/७/२०१९ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी पारीत करण्यात आलेली आहे.

(डॉ. रवींद्र शिसवे)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर.